**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# विद्यापीठात 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६' विषयावर कार्यशाळा संपन्न

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये मानव संसाधन विकास केंद्राद्वारे विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी तसेच महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा अधिसभागृहात संपन्न झाली. कार्यशाळेत रासायनिक तंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. विलास सपकाळ यांनी 'उच्च शिक्ष्ज्ञण क्षेत्रातील प्रशासकीय धोरण', भौतिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ.एस.के. ओमनवार यांनी 'शैक्षणिक उपक्रमांना पाठींबा देण्याकरीता विद्यापीठ अधिकाऱ्यांची भूमिका' व अधिसभा सदस्य डॉ.डी.एस. धोटे यांनी 'विद्यापीठ कायद्याच्या कार्यकक्षेतील कर्मचाऱ्यांची भूमिका' यावर विषयाच्या अनुषंगाने विद्यापीठ कायदा सविस्तरपणे प्रशिक्षणार्थींना समजावून सांगितला. तसेच सार्वजनिक विद्यापीठे, विद्यापीठाचे अधिकारी, विद्यापीठाची प्राधिकरणे, परिनियम, आदेश आणि विनियम, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, अध्यापक आणि कर्मचारी यांच्या तक्रारीचे निवारण, प्रवेश, परीक्षा, मूल्यमापन व विद्यार्थ्यांशी संबंधित इतर बाबी, समित्या व परिषद, परवानगी, संलग्नीकरण व मान्यता, नाव नोंदणी, पदव्या व दीक्षांत समारंभ, विद्यापीठ निधी, लेखे व लेखापरीक्षा, संक्रमणात्मक तरतूदी आदी विषयांवर महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.

उद्‌घाटन सत्राप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, मानव संसाधन विकास केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर व भौतिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ.एस.के. ओमनवार, उपकुलसचिव (आस्था.) श्री प्रवीण राठोड, तर दुसऱ्या सत्राप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी उपकुलसचिव (लेखा) डॉ. नितीन कोळी व कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे उपस्थित होते.

प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करतांना कुलसचिव डॉ. तुषार देशमुख म्हणाले, प्रशासकीय काम करीत असतांना वारंवार प्रशिक्षणाची गरज भासते. प्रशिक्षणामुळे नवनवीन कामाची उजळणी होते आणि त्यामुळे प्रशिक्षणार्थींची प्रशासकीय कामातील गती वाढण्यास निश्चितच लाभ होतो. प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमुळे प्रशासन गतीमान होते आणि त्याचा जास्तीतजास्त लाभ हिततुल्य घटकांना होण्यास हातभार लागतो. भविष्यात अशाप्रकारचे आणखी प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी याप्रसंगी दिली.

समारोपप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर म्हणाले, कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याकरीता कायद्यातील बारकावे, त्यातील तरतूदी माहित असणे गरजेचे आहे. प्रशिक्षणार्थींना कायद्यावर प्रशिक्षण मिळाल्यामुळे कायद्यातील बारकावे त्यांना समजून घेता आले. वक्त्यांनी उत्कृष्टपणे कायद्यावर विवेचन करुन नवीन विद्यापीठ कायदा प्रशिक्षणार्थींना समजावून सांगितला. प्रत्येकाने सकारात्मक कायद्याचा वापर करुन आपल्या हिततुल्य घटकांना जास्तीतजास्त सेवा देण्याचा प्रयत्न करावा. सामाजिक दृष्टीकोन व्यापक ठेवून कायद्याकडे पहावे, असे आवाहन त्यांनी केले. भविष्यात जिल्हास्तरावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजनाबाबत प्रयत्न करावेत, अशा सूचना दिल्यात. याप्रसंगी उपकुलसचिव (लेखा) डॉ. नितीन कोळी यांनी दुसऱ्या सत्रात अध्यक्षीय भाषण केले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक मानव संसाधन विकास केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर यांनी केले. प्रशिक्षण कार्यक्रम आयोजनामागील प्रशासकीय भूमिका उपकुलसचिव (आस्था.) श्री प्रवीण राठोड यांनी मांडली. याप्रसंगी उपकुलसचिव (विकास) श्री मंगेश वरखेडे, श्री सतेज केचे, सौ. स्मिता साठे व महाविद्यालयातील डॉ. गडपायले यांनी मनोगत व्यक्त करुन उत्कृष्टपणे प्रशिक्षणाचे आयोजन केल्याबद्दल विद्यापीठाप्रती ऋण व्यक्त केले आणि भविष्यात अशाप्रकारच्या प्रशिक्षणाचे वारंवार आयोजन व्हावे, अशा भावना व्यक्त केल्यात. संचालन करीत आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. कार्यशाळेला विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी व महाविद्यालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २४/०७/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी